

✍ जयंत नारळीकर

# आकाशातले डोळे

टॉम रोहरिचने पुन्हा एकदा कारच्या डॅशबोर्डवर नजर टाकली. त्याच्या अंदाजाप्रमाणे एल पासो अजून सदतीस मैलांवर होते. 'टेक्सस हे अमेरिकेतले एक अफाट पसरलेले स्टेट आहे' ह्या भुगोलाच्या वाक्यातले सत्य त्याला प्रथमच जाणवत होते. तशी टॉमने एकट्याने शेकडो मैल मोटार अनेकदा हाकली असेल. पण आज त्याला शेजारी एखादा सोबती (नाहीतर सोबतीण) पाहिजे असे सारखे वाटत होते. निदान गेले दोनशे मैल तरी ! कारण रस्ता सरळ, जवळजवळ मनुष्यवस्ती नसलेल्या भागातून जात होता. चालकाला विरंगुळा मिळण्यासारखे काही नव्हते. अशा ठिकाणी मोटार बिघडली तर?

गेला एक तास सतत कार चालवल्या-मुळे होणारी मानसिक थकावट टॉमला प्रकर्षाने जाणवायला लागली होती.

एकीकडे एल पासोचा टप्पा शक्य तितक्या लवकर गाठावा ही इच्छा आणि मधे थांबून विश्रांती घेतल्यास 'झोप लागली तर?' ही भीती. दुसरीकडे आपल्यात सुरक्षितपणे कार चालवण्याची पात्रता आहे का ही वाढती शंका...रस्त्यातले लहानसे वळण न दिसल्याने टॉमची कार एकदम शेजारच्या 'सॉफ्ट शोल्डर'वर गेली आणि त्याने सुरक्षिततेच्या बाजूने निर्णय घेतला.

सॉफ्ट शोल्डरवर गाडी थांबवून टॉम पाय मोकळे करायला उतरला. सूर्यास्त नुकताच झाला होता. संधि प्रकाशात आसपास अफाट पसरलेल्या प्रदेशाकडे पाहताना टॉमला लहानपणी अधाशीपणे पाहिलेल्या अनेक 'वेस्टर्न' चित्रपटांची आठवण झाली. कुठे न्यूयॉर्क टोकियो-सारखे गजबजलेले भाग व कुठे असले निर्मनुष्य प्रदेश? हे एकाच पृथ्वीतलावर आहेत यावर विश्वास बसणार नाही ! आपण आत्ता एका वेगळ्याच ग्रहावर आहोत अशी कल्पना करूया का? टॉम विज्ञानकथांचा शौकीन होता.

विज्ञानकथा...अंतराळ याने... त्यातून फिरणारे छोटे हिरवे लोक... मानवापेक्षा अतिप्रगत असलेले जीव-खरोखर विश्वात हे सर्व असेल का? ह्या अफाट पसर-लेल्या विश्वात मानव एकटाच प्रगत (?) जीव असण्याची शक्यता फार कमी असे बहुतेक शास्त्रज्ञ मानतात. मग हे अति प्रगत जीव पृथ्वीकडे का येत नाहीत?

टॉमचे लक्ष पश्चिमेच्या क्षितिजाकडे गेले. संधिप्रकाश बराच कमी झाल्याने आता त्याला ती वस्तू स्पष्ट दिसली. ती चमकत होती आणि पिवळट होती आणि तिचा आकार मोठा होत होता. प्रथम टॉमला जरा चमत्कारिक वाटले. पण नंतर त्याच्या लक्षात आले - ती वस्तू त्याच्या दिशेने येत होती.

प्रथम ताऱ्याप्रमाणे वाटणारी ती वस्तू एक विमान असावे असे त्याला वाटले. इतके खालून उडणारे विमान म्हणजे ते 'क्रॅश' तर होणार नसेल?... पण त्या

## श्री. जयंत नारळीकर

*विज्ञान हा केवळ शास्त्रज्ञांचाच विषय नाही तर तो प्रत्येकाचाच आहे, याची जाणीव करून देण्याची सामाजिक जाणीव करून देण्याचे काम प्रा. जयंत नारळीकर आपल्या विविध लेखनाद्वारे, वैज्ञानिक कथांद्वारे आणि अनेक शहरात जाऊन दिलेल्या व्याख्यानांद्वारे करीत असतात. भारताच्या वैज्ञानिक ग्रहमंडलात श्री. नारळीकर हा एक 'उत्तम प्रतीचा' ग्रह आहे. त्यांच्या विज्ञानकथा केवळ मनोरंजकच नाहीत, तर बौद्धिक आनंद देणाऱ्या असतात. आकाशातील तारे, ग्रह, नक्षत्र यांच्या परिवारात मानवाचे स्थान कोणते आहे, याची जाणीव ते करून देतात. 'आयुका' या पुण्याच्या विज्ञानविषयक संस्थेत ते अनेक वर्षे काम करताहेत. भारताचे भूषण श्री. नारळीकर यांची 'आकाशातील डोळे' ही कथा सा. 'सिंहासन'च्या दरबारातील एक 'अनमोल रत्न' आहे, असे आम्ही समजतो. आपणही याशी सहमत व्हाल अशी अपेक्षा....!*

यानाची उंची कमी होती नव्हती. शिवाय त्याचा पृष्ठभाग विमानासारखा नाही, हे त्याला आढळून आले आणि एक वेगळी जाणीव झाली त्याला - यानातून एक विचित्र असा कर्णकटू आवाज येत होता.

तो आवाज असह्य व्हायला लागल्या-वर टॉम कारमध्ये शिरला व त्याने खिडक्या-दारे बंद केली. आवाजाचा जोर कमी झाला तरी त्याची कर्कशता वाढत होती.

बेशुद्ध पडण्यापूर्वी टॉमची शेवटची आठवण होती - आपण कानात खुपसायला काहीतरी शोधतोय याची !

शिवा कुंभार घरी चालला होता. 'चालला' म्हणण्यापेक्षा तो झोकांड्या खात होता असे म्हणणे बरे होईल. आज जुगारात थोडे पैसे हातात पडले होते आणि त्यांचे बाटलीत रूपांतर झाले होते.

रात्रीचे बारा वाजायला आले होते. घरी लवकर पोचावे म्हणून शिवाने माळरानातून जाणारी पायवाट निवडली होती. त्याला 'चढली' नसती तर कदाचित ह्या आडवाटेने यायचा त्याला धीर झाला नसता. कारण रात्री तेथे भुतांचे वास्तव्य असते, असा प्रवाद गावकऱ्यांत प्रचलित होता...

झोकांड्या खात जात असताना शिवा एकदम कशावर तरी आपटला. त्याच्या अंगावर प्रकाशझोत पडला. शिवाने समोर पाहिले आणि त्याची दातखीळच बसली.

समोर एक मनुष्याकृती होती- पण ती संपूर्ण हिरवी होती. शिवाच्या डोळ्यां-देखत ती आकृती प्रकाशमान झाली आणि आकाशाच्या दिशेने जाऊ लागली. शिवाने वर पाहिले. त्याला ती आकृती एका अंतराळ यानात शिरताना दिसली आणि ते यान तेथून दूर जाऊ लागले. पण ते बघायला शिवा शुद्धीवर नव्हता.

सिसलीतल्या एका खिश्चन मठात ती 'नन' होती. बिचारी लहानपणापासून मुकी होती - पण आपल्या सुरेख हस्ता-क्षराने आणि चित्रकलेने ती कोणाशीही उत्तम 'संभाषण' करू शके. तरी नैसर्गिक उणिवेची सारखी जाणीव असल्यामुळेच की काय ती एकलकोंडी असे. मठातल्या जोगिणी तिला सिस्टर मरीया म्हणत. तिचे खरे नाव देवास ठाऊक. कारण पोरकी पोर म्हणून ती दोन महिन्यांची असताना मठाच्या दाराशी त्यांना सापडली होती.

आज रात्री मात्र काही तरी वेगळेच घडले ! नेहमीप्रमाणे एकटी फिरून मरीया परत आली ती थेट मदत सुपीरियरकडे गेली. कधी नव्हे ती ही मुलगी आपण होऊन भेटायला आली याचे मदरला आश्चर्य वाटले. तिने मरीयाला बसवून विचारले, 'मुली, का आलीस?'

मरीयाने जवळ नेहमी असलेले कागद काढले आणि त्यावर लिहायला सुरुवात केली. तिला आज काही तरी विशेष

दिसले होते- आकाशातून आलेले. तिने चित्रे काढून आपले अनुभव सांगितले.

मदर सुपीरियरने ते सर्व वाचून अविश्वासाने डोळे मोठे केले, पण त्याच-वेळी माळेतला क्रॉस हातात धरला.

वॉशिंग्टनभोवती पसरलेल्या उप नगरांतील एका उपनगरात काही शास्त्रज्ञांची पार्टी चालू होती. बहुतेक शास्त्रज्ञ नासा (नॅशनल एरोनॉटिक्स ॲण्ड स्पेस ॲडमिनिस्ट्रेशन) च्या गॉडर्ड स्पेस फ्लाइट सेंटरमधून व मेरिलंड युनिव्हर्सिटीमधून आले होते. हे सर्व शास्त्रज्ञ त्यांच्यापैकी एकाला - रॉजर बकलंडला निरोप देण्यासाठी त्याच्या घरी आले होते.

रॉजर बकलंड हा 'गॉडर्ड'मध्येच काम करणारा एक प्रख्यात अंतराळ शास्त्रज्ञ होता. स्कायलॅब, स्पेसलॅब वगैरे प्रयोगांची मालिका सुरू झाल्यावर अंतराळात जाऊन प्रयोग करणाऱ्या शास्त्रज्ञांची जी एक नवीन पिढी निर्माण झाली त्यातला तो अनुभवी 'दादा' समजला जाई. वास्तविक अलीकडे त्याने फार महत्त्वाचे प्रयोग असल्याशिवाय अंतराळात जायचे बंद केले होते. कारण त्याच्या मते आता नवीन पिढीचे दिवस आले होते व त्याच्या-सारख्या चाळीशी ओलांडलेल्या 'वृद्धा'ने आता निवृत्त व्हायला पाहिजे होते ! परंतु अंतराळातल्या तांत्रिक व वैज्ञानिक समस्या सोडवायला शक्तीपेक्षा अनुभव अधिक मोलाचा हे वारंवार दिसून आल्याने वेळोवेळी रॉजरला पाचारण केले जाई.

'ही माझी शेवटची खेप ! आपण तर बुवा आता कंटाळलो. आता परत आलो की, फक्त गॉल्फ आणि सेलिंग (शिडाची बोट चालवणे) यातच मी वेळ खर्च कर-णार.' रॉजर दरवेळी असे म्हणे व त्याचे सहकारी तिकडे दुर्लक्ष करीत. तो स्वतः तरी असे मनापासून कुठे म्हणत होता?

'मी पैज मारतो रॉजर. परत आल्यावर तू फार तर महिना-दोन महिने विश्रांती घेशील आणि मग येशील परत कामात डोकं खुपसायला.' त्याचा एक सहकारी म्हणाला.

'आणि मी परतच आलो नाही तर?' रॉजरने विचारले.

'तेवढे कुठले आले आमचे भाग्य? आता अंतराळयात्रा तर मानवाचे सर्वात सुरक्षित साधन आहे.' - एक शास्त्रज्ञ उद्गारला. दुसरा त्याला पुष्टी देत 'काय विचित्र परिस्थिती आहे पाहा ! अंतराळयात्रा विमानयात्रेपेक्षा अधिक सुरक्षित आणि विमानयात्रा कारपेक्षा अधिक सुरक्षित म्हणजे जितकी जवळची यात्रा तितका धोका जास्त....'

'व सर्वात जास्त धोका पायी चालून रस्ता ओलांडण्यात आहे असं मी कुठं तरी वाचलं !' आणखी एक शास्त्रज्ञ म्हणाला.

हास्यविनोदात रॉजर पण सामील झाला, पण तो मुळात सचिंत आहे हे फक्त एकाच व्यक्तीच्या ध्यानात आले. ही व्यक्ति त्या शास्त्रज्ञापैकी नव्हती- ती बाहेरून आली होती. इतरांशी फारशी ओळख नसल्यामुळे ती गप्पांत भाग घेत नव्हती. ती व्यक्ती म्हणजे रॉजरचा बाल-पणचा मित्र विलियम (बिल) बोन्स- आजची रात्र रॉजरकडे राहायला आलेला पाहुणा.

बिल शास्त्रज्ञ नव्हता, तंत्रज्ञही नव्हता. तू काय करतोस म्हणून विचारले असते तर त्याने खरे उत्तर देण्याची शक्यता कमीच. त्याच्या त्या वेळच्या कामाप्रमाणे सोयीस्कर असा धंदा त्याने सांगितला असता. आता जमलेले शास्त्रज्ञ समजत होते की, बिल हा एका कॉम्प्युटर फर्मचा एजंट आहे, न्यूयॉर्कहून काही कामासाठी वॉशिंग्टनला भेट देतोय...

पार्टी जवळ जवळ दोन वाजता बरखास्त झाली. बाटल्यांचे क्रेट बाजूला आणि ग्लासेस डिशवॉशरमध्ये टाकून रॉजरने कॉफी बनवायला टाकली आणि हाश-हुश करत एका सोफ्यावर अंग भिरकावून दिले. तो बराच दमलेला दिसला म्हणून बिलनेच दोन मोठे 'मग' कॉफीने भरून आणले.

'काळी की गोरी?' त्याने रॉजरला विचारले.

'काळी.' रॉजरने त्याच्या हातून पेला घेत म्हटले. बिल एका रॉकिंग चेअरवर टेकला आणि उद्गारला :

'सांग आता. एका अंतराळ शास्त्रज्ञाला एफबीआय एजंटची जरूरी का भासली?'

'बिल, आजची पार्टी मला निरोप देण्याकरता होती हे तुला माहीत आहे.' रॉजर म्हणाला. 'कारण मी लवकरच एका अंतराळयात्रेवर जाणार आहे.'

'पण त्यात विशेष काय आहे तुझ्या दृष्टीने? तू तर किती तरी वेळा वेग-वेगळ्या स्पेश मिशन्सवर गेला आहेस.' पाइप पेटवत बिल उत्तरला.

'तू म्हणतोस ते बरोबर आहे. पण माझे अंतर्मन सांगते की, मी ह्या यात्रेवरून परत येणार नाही!' रॉजरच्या चेहऱ्यावर कसलीही भावना नव्हती.

'कमाल आहे, तुझ्यासारखा शास्त्रज्ञ पण अंतर्मनाच्या गोष्टी बोलू लागला?' बिलने किंचित हेटाळणीच्या स्वरात म्हटले. उत्तरादाखल रॉजरने आपल्या जवळच्या टेबलातला एक खण उघडून त्यातला एक गठ्ठा बिलपुढे टाकला. त्यात वर्तमानपत्रांची कात्रणे होती.

'टेक्सासमध्ये फ्लाईंग सॉसर्स?', 'तारापूरजवळ छोटी हिरवी माणसे', 'जोगिणीला आकाशातून देवदूतांचे दर्शन' अशा तऱ्हेची शीर्षके असलेली जगाच्या कानाकोपऱ्यातून वेगवेगळ्या देशांतली बातमीपत्रे त्या गठ्ठ्यात होती.

'अलीकडे सिनेटर ब्लॅकमनने भाषणे करायला सुरुवात केली आहे की, पृथ्वीवर परकीय लोकांचा हल्ला होणार आहे आणि त्यांची याने टेहळणी करत आहेत. अशा तऱ्हेच्या बातम्या त्याला मालमसाला पुरवतात. अमेरिकन काँग्रेस-तर्फे नाही तर युनायटेड नेशन्सतर्फे याची चौकशी व्हांवी अशी त्याची ओरड चालू आहे.' - रॉजर.

'होय, मला त्याची भाषणे माहीत आहेत. पण त्याला तुमच्यासारख्या शास्त्रज्ञांनी समर्पक उत्तरे पण दिलीत, असे मला वाटते.' बिल म्हणाला.

'अंतराळ किती अवाढव्य पसरलेले आहे याची ज्याला कल्पना आहे, तो असल्या फ्लाईंग सॉसर्सवर विश्वास ठेवणार नाही. आपल्या अगदी जवळच्या ताऱ्यांकडे, प्रकाशालाच जाऊन-येऊन आठ-दहा वर्षे लागतात. मग प्रकाशापेक्षा अतिशय हळू जाणाऱ्या यानाला वेळ किती लागेल? अपोलो यानाला चंद्रावर जाऊन यायला जवळजवळ आठवडा लागला-प्रकाशाला ते अंतर तोडायला दीड सेकंद लागतो. आता तूच त्रैराशिक मांडून बघ.' रॉजर तावातावाने बोलत होता.

'पण जवळजवळ प्रकाशाच्यावेगाने किंवा प्रकाशापेक्षा अधिक 'वेगमर्यादा गाठून ही अंतरे तोडायला कमी वेळ लागेल.' बिल म्हणाला.

'अरे, आईन्स्टाईनच्या सापेक्षतावाद सिद्धांताप्रमाणे प्रकाशाची वेगमर्यादा ओलांडणे आपल्या सर्वसाधारण वस्तूंनी बनवलेल्या यानांना अशक्य आहे. फार काय ही वेगमर्यादा गाठायलासुद्धा ऊर्जेची प्रचंड किंमत मोजावी लागते, जरा गणित मांडल्याशिवाय 'हे अशक्य आहे' असे अर्थातच मी तुला पटवू शकणार नाही.'- रॉजर.

'पण आपली मानवसंस्कृती मर्यादित ज्ञानाचीच आहे हे तू विसरतोस. आपल्या-पेक्षा अतिप्रगत संस्कृती- आईन्स्टाईन याच्या पुष्कळ पुढे गेलेले निराळे मार्ग वापरून कशावरून प्रवास करत नस-तील?' बिलने रॉजरला किल्ली दिली.

'त्याबाबत शास्त्रज्ञांचे उत्तर ऐक ! मानवाने काही ज्ञानाची, विज्ञानाची, तंत्रज्ञानाची अंतिम सीमा गाठलेली नाही. उलट ह्या बाबतीत तो बराच मागासलेला आहे असंच शास्त्रज्ञ म्हणतात. आपल्या आकाशगंगेत लाख दहा लाख अतिप्रगत संस्कृतील असतील असाही त्यांचा अंदाज आहे. आपण क्षणभर असं धरून चालू की, अशा संस्कृतीपाशी प्रकाशाच्या वेगाने किंवा त्याहून अधिक वेगाने जाणारी वाहने आहेत. अर्थात त्यांचे तंत्रज्ञान अगदी वेगळ्या पातळीवर पोचलेले नसेल हे तुलाही कबूल करावे लागेल. पण ह्या तंत्रज्ञानातून निर्माण झालेली वाहने- म्हणजे उडत्या तबकड्या किंवा सिगारच्या आकाराची याने - आपल्या सध्याच्या वाहनांपेक्षा फारशी वेगळी नसावीत, हे चमत्कारिक नव्हे का? बैलगाडी आणि जेट विमान यांच्यातल्या तंत्रज्ञानात जेवढा फरक आहे त्याच्या कितीतरी पटीने जास्त फरक आपल्या अंतराळ तंत्रज्ञानात आणि ह्या अतिप्रगत तंत्रज्ञानातअ सला पाहिजे हे वेगळं सांगायला नको ! आणि एवढं अतिप्रगत तंत्रज्ञाना ज्यांना अवगत आहे त्यांनी आपल्यासारख्या य:कश्चित वसाहतीचा माग काढत यावं हे हास्यास्पद नव्हे का?'

'पण मग इतक्या मंडळींना उडत्या तबकड्या दिसतात त्याचं काय?' गठ्ठ्याकडे बोट दाखवत बिलने विचारले.

'१९४७ मध्ये उडत्या तबकड्या दिसल्याची पहिली नोंद आली, केनेथ आरनॉल्ड नावाच्या वैमानिकाकडून. त्यानंतर वेगवेगळ्या लोकांनी नमूद केलेल्या अशा शेकडो घटना पुढं यायला

लागल्या. त्यांची वेगवेगळ्या स्वरूपात छाननी झाली. प्रॉजेक्ट ब्लू बुक, कोलोराडो प्रॉजेक्ट...'

'होय. मी ऐकलंय त्यांच्याबद्दल. बहुतेक घटना साधी विमाने, पृथ्वीवरचीच अंतराळयाने, शुक्र ग्रहासारखे आकाशस्थ ग्रह किंवा तारे किंवा वायुमंडलात घडणाऱ्या हवा, पाणी, प्रकाश यांच्या किमया अशा सदरात मोडणाऱ्या होत्या. काही बाबतीत साक्षीदार त्यांच्या मानसिक अवस्थेमुळे किंवा बढाईखोर प्रवृत्तीमुळे किंवा इतर कारणांनी विश्वासार्ह समजले गेले नाहीत.' - बिल.

'हीच परिस्थिती ह्या कात्रणांची नसेल का? आता पाहा, टेक्ससमध्ये टॉम रोहरिचला उडती तबकडी दिसली - पण तो बराच वेळ ड्रायव्हिंग करून दमलेल्या मन:स्थितीत होता. आपण सुरक्षितपणे कार चालविण्याच्या मन:स्थितीत नव्हतो हे त्यानेच कबूल केलंय. ही सिसलीमधली दुसरी केस. ह्या मरीया जोगिणीला देवदूत वगैरे दिसतात अशी पूर्वीपासूनच तिची ख्याती - खरं खोटं देव जाणे ! आणि हा तारापूरजवळचा खेडूत तर चक्का प्यायलेलाच होता. त्यानंतर ही मेक्सिकोतली केस, कंबोडियातील केस... मी प्रत्येक केस तपासली. विश्वासार्ह साक्षीदार म्हणण्यासारखा एकही नाही...'

'तू म्हणतोस ते बरोबर आहे रॉजर ! साध्या गुन्ह्याच्या बाबतीत हे सर्व साक्षीदार उलट तपासणीत कोलमडून पडले असते.' बिल म्हणाला, 'पण अजून तू मुद्द्यावर आला नाहीस. तुझ्या पहिल्याच विधानाचा अजून खुलासा व्हायचाच आहे.'

'आता तिकडेच वळतो. अरे, मी काय सांगणार आहे त्यापूर्वी माझी स्वत:ची उडत्या तबकड्यांबाबतची पार्श्वभूमी स्पष्ट केली. अशी याने पृथ्वीबाहेरून परकीय अतिप्रगत संस्कृतीकडून येत असतील हे मला मान्य नाही, हे प्रथम स्पष्ट करतो. आता हे चित्र पाहा.' खिशातून एक फोटो काढून त्याने बिलकडे दिला.

कॉम्प्युटरवर जुळवून फोटोप्रमाणे तयार केलेले ते चित्र होते. त्यावर 'टॉप सीक्रेट' असा शिक्का होता व नासाचा छाप होता. पण बिलचे लक्ष केंद्रीत झाले ते फोटोच्या उजवीकडच्या भागात.

त्यात एक सिगारच्या आकाराची वस्तू असून तिच्या आजुबाजूला ठिपके होते. बिलने आपला मॅग्निफाईंग ग्लास काढून पाहिले आणि त्याच्या तोंडून एक शीळ बाहेर पडली.

'वास्तविक मी ते चित्र तुला दाखवू नये. तू आता जेलेन्समधून पाहिलंस ते आम्ही त्यापेक्षा सहस्त्रपटीने मोठे करून पाहिलेय, पण तुला कल्पना आली असेलच.' रॉजर म्हणाला.

'हे ठिपके मनुष्याकृती असून ही मोठी वस्तु म्हणजे एक अंतराळयान आहे.' बिलने पुढं विचारलं, 'पण हा फोटो कुठून मिळाला?'

'गेल्या मे महिन्यात आमचे एक यान

वर गेलं होतं. त्यावरील माझ्या एका सहाध्यायाने, डॉ. फ्रॉस्टने, घेतलेला तो फोटो आहे. बहुतेक जीवनातलं त्याचं ते शेवटचं काम असावं. कारण त्या यानाचं पुढं काय झालं हे आम्हाला कळलं नाही...'

'पण अंतराळ यान हरवणे म्हणजे साधी घटना नव्हे; मला ते कुठंच वाचल्याचं आढळलं नाही.' बिल आश्चर्याने उद्‌गारला.

'त्याबाबतीत गुप्तता पाळणं आवश्यक होतं, कारण ते आमचं हरवलेलं चौथं अंतराळ यान होतं. पहिलं यान मिलिटरीचं, दुसरं सी. आय. ए. चं, तिसरं शास्त्रीय प्रयोगांचं. अशी एकापाठोपाठ एक तीन याने ह्या वर्षाच्या पहिल्या तीन महिन्यात बेपत्ता झाली. तेव्हा त्यांच्या मागावर गेलेलं हे यान होतं. काही विलक्षण घडलं तर लगेच फोटो घेऊन ग्राऊंड कंट्रोलकडे पाठवायची विशेष सोय त्यात करण्यात आली होती. विलक्षण परिस्थितीत माणसाची विचारशक्ती कदाचित काम करणार नाही म्हणून प्रथम इमर्जन्सी बटण दाबून फोटो पाठवायला सुरुवात करायची फ्रॉस्टला सूचना होती आणि मग त्यानं तोंडी संदेश पाठवायचा आणि हे बरं झालं. कारण फक्त पाच सेकंद अवधी मिळाला त्यात एक हजार फोटो आले - त्यातला हा एक. फ्रॉस्टला बोलायला फक्त तेवढाच वेळ मिळाला आणि मग आमचा संपर्क तुटला.'

'फ्रॉस्ट काय म्हणाला?' बिलने विचारले.

'त्याचे शेवटचे व एकमेव वाक्य होते'-

'अंतराळ यान... त्यातून हिरवी माणसे बाहेर पडताहेत... पण-'

खोलीत क्षणभरच स्तब्धता होती. पण दोघांना ती जाणवली, विशेषकरून एअरकंडिशनिंगचा आवाज त्यांना एकदम जोरात झाल्याचा भास झाला. पाईपमधली राख झाडत बिलने विचारले,

'अर्थात ह्या संदेशाची आणि फोटोंची छाननी तुम्ही केली असणारच. फ्रॉस्ट हा कसा माणूस आहे?'

'आहेपेक्षा होता म्हण. त्याला कल्पनाशक्ती कमी, पण सांगितलेले काम व्यवस्थित करायची सवय. जे दिसेल ते नमूद करायचं. मनात असेल ते सरळ सांगायचं अशा बाण्याचा होता बिचारा. आणि काही झालं तरी फोटो खोटं बोलणार नाहीत.' रॉजर म्हणाला.

'मग आता काय करणार? ही गुप्तता तुम्हाला फार वेळ पाळता येणार नाही.' बिल म्हणाला.

'होय ! म्हणून आता एक शेवटचा प्रयत्न म्हणून शास्त्रज्ञांचे एक पथक निघणार आहे आणि मला त्याचं नेतृत्व करायचं आहे. फ्रॉस्ट परत आला नाही, असे न सांगता तो एका अपघातात बुडून मेला असं सांगण्यात आलं. पण आम्ही सहाजण परत आलो नाही तर मात्र खरी गोष्ट जाहीर होणं आवश्यक आहे. पण तशी वेळ न येवो.'

बिलच्या डोळ्यांपुढे एक चित्र उभे राहिले : सिनेट ब्लॅकमन जोरात भाषण करून लोकांना सांगतोय, 'पृथ्वीचे दिवस भरत आले. निदान मानवाचे तरी. आता परकीय हस्तक्षेप अटळ आहे. आम्ही आधीपासून सांगत होतो खबरदारी घ्या... पण आमचे ऐकले नाही.' त्याला आठवले की, ब्लॅकमनच्या भाषणांना ह्या वर्षाच्या सुरुवातीपासूनच जोर चढला होता. त्याच सुमारास त्याच्या पुढं असलेल्या कात्रणांच्या गठ्ठ्यात भर पडू लागली होती. तो म्हणाला :

'रॉजर, तुला काय वाटतं खरं सांग !'

'त्याचसाठी तर मी तुला इथे बोलावलं आहे. शास्त्रज्ञ प्रत्यक्ष अवलोकन आणि तपासणी केल्याशिवाय मत देत नाही आणि मी पण फ्रॉस्टने काय पाहिलं त्यावर भाष्य करू इच्छित नाही. पण तो संदेशाच्या शेवटी शेवटी 'पण'... असे काय म्हणाला? त्याला आणखी काय सांगायचे होते? मला तर अजून वाटतं की, हा परकीय हल्ल्याचा प्रकार नसावा. पण मग हे लोक येणार कुठून? का ते सर्वच मायाजाल होतं? पण मग ते इलेक्ट्रॉनिक्सची फसवणूक कसे करू शकले? पण परकीय हल्ला हा पर्याय सोडून दुसरा कुठला पर्याय मला सुचला तर मी तो पडताळून पाहीन. समजा, मी आणि माझे सहकारी परत आलो नाही तर तू माझी ही शंका विचारात घे. कदाचित तुझ्या सुपीक पोलिशी डोक्याला तो पर्याय सापडेल.'

'आणि तो सापडला तर?' बिलला काही फारशी आशा नव्हती.

'तर तू ह्या नंबरवर फोन कर.' रॉजरने त्याला एक नंबर देऊन म्हटलं, 'हा टॉप सीक्रेट नंबर माझ्या बॉसचा आहे. त्याला विश्वासात घे. त्याला आम्ही सर्व 'मिस्टर बी' म्हणतो, कारण आम्हालाही तो कोण आहे हे माहीत नाही.'

'एक विनंती आहे.' फोटोकडे पाहात बिल म्हणाला. त्याच्या मनातले ओळखून रॉजरने काही न बोलता तो फोटो त्याच्याकडे दिला.

रॉजरचा निरोप घेऊन बिल दुसऱ्या दिवशी आपल्या घरी गेला. त्याला सारखे वाटत होते की, रॉजर म्हणतो त्याप्रमाणे ह्या सर्व घटनांची कारणमीमांसा वेगळ्या प्रकारे करता येईल. दुरून कुठूनतरी अतिप्रगत ग्रहावरून ही याने आली असावीत असं काही त्याला पटत नव्हतं. पण पुरावा तर भक्कम होता. गेल्या दहा महिन्यात जगाच्या वेगवेगळ्या भागांतल्या लोकांनी अशी याने किंवा हिरवे लोक पाहिल्याचा दावा केला होता आणि हे सर्वच लोक अविश्वसनीय मानले तरी खुद्द नासाच्या फ्रॉस्टने घेतलेल्या फोटोंचा पुरावा कसा नाकारायचा? आणि तसला एक पुरावा तर त्याच्या खिशात होता.

तो फोटो त्याने परत काढून पाहिला. सर्वतऱ्हेने तो वास्तविक- खरा-विश्वासार्ह होता. अर्थात खुद्द नासाच्या अंतराळ यान व कंट्रोलरूमने तो 'प्रोसेस' केला असल्याने 'फेक' असण्याची शंका घेण्याचे कारण नव्हते. (त्याला कुठे तरी वाचल्याचे आठवले - एका उडत्या तबकडीचे म्हणून प्रसिद्ध करण्यात आलेले

फोटोतज्ज्ञांनी विश्लेषण करून खोटे असल्याचे सिद्ध केले होते. फार काय त्या फोटोतली तबकडी म्हणजे फोटोग्राफरने चक्क 'लेन्स कॅप' वापरली होती !)

जरी नासांच्या तज्ज्ञांनी फोटोंचे विश्लेषण केले होते तरी बिलने त्याच्या-जवळच्या फोटोचे स्वतः विश्लेषण करायचे ठरवले. एरवी तो एफ. बी. आय. च्या प्रयोगशाळेत जाऊन त्यांच्या तज्ज्ञांकरवी हे करवून घेऊ शकला असता. पण हा फोटो होता 'टॉप सीक्रेट' - फक्त त्यानेच पाहायचा. हे काम खासगी रीत्याच झाले पाहिजे व शक्यतो रॉजर मिशनवर निघायच्या आत.

त्याने आपल्या एका मित्राचा फोन लावला. जॅक बाल्डविन हा एक खगोलशास्त्रज्ञ होता. दुरून येणाऱ्या आकाशगंगांचे फोटो इलेक्ट्रॉनिक्सच्या मदतीने न्याहाळून पाहण्याचा त्याचा नेहमीचाच धंदा ! त्या बाबतीत त्याचा हात धरणारा कोणी नव्हता. डोळ्याला किंवा लेन्समधून किंवा मायक्रोस्कोप-मध्येसुद्धा जी माहिती मिळत नसे ती तो इलेक्ट्रानिक्सचा फायदा घेऊन त्याचे मोठे कॉम्प्युटर चित्र काढून मिळवीत असे. पण तो होता कॅलिफोर्नियात.

'जॅक, मला एक फोटो न्याहाळून पाहायचाय, तू मदत करशील का? जरा अर्जंट काम आहे.'

'तुझे काम नेहमीच अर्जंट असते. मी पुढचे दोन दिवस माऊंट पॅलोमारवर वेध घ्यायला जाणार आहे. खरं म्हणजे त्यानंतर हायकिंगला जाणार होतो.'

'ते तू विसर आता. परवा मी पण येतो लॉसएंजिलिसला.' जॅकला पुनर्विचार करायचा अवसर न देता बिलने फोन बंद केला. त्याने हिशोब केला. रॉजरचे स्पेस मिशन फ्लॉरिडाहून निघायला अवघे दहा दिवस उरले होते. म्हणजे दहा उणे दोन आठ. ते मिशन निघायच्या आत मिस्टर बींना फोन करून किंवा प्रत्यक्ष भेटून सांगायला एक दिवस तरी पाहिजे. म्हणजे सात किंवा सहाच म्हणा - टु बी ऑन द सेफ साइड.' इतक्या दिवसात आपण काहीतरी माहिती मिळवली पाहिजे.

ठरल्याप्रमाणे तो लॉस एंजिलिसला येऊन जॅकच्या पॅसाडीनामधील लॅबमध्ये दाखल झाला. जॅक नुसताच पॅलोमारहून आला होता. बिलने त्याला तो फोटो दाखवला. त्याच्या पाठीमागचे शिक्के मिटवण्याची खबरदारी त्याने घेतली होती.

'काय माझी थट्टा करायचा विचार आहे? हा फोटो एखाद्या विज्ञानकथेत शोभेल असा आहे.' जॅकने तक्रारीच्या सुरात विचारले.

'तेच आम्हाला ठरवायचे आहे. ह्या फोटोचे होईल तितके सूक्ष्म निरीक्षण करून पाहिजे.' बिल जॅकला शक्य तितक्या कमी गोष्टी सांगायला बघत होता.

'हा साधा कॅमेऱ्यातला फोटो नव्हे. इलेक्ट्रॉनिक्सच्या साहाय्याने घेतला आहे. ह्यात दिसते त्यापेक्षा बरीच माहिती असू शकेल.' फोटोचे वरकरणी निरीक्षण

करत जॅकने विचारले, 'तू नक्की काय शोधतोस ते सांगितलंस तर बरं. म्हणजे वेळ वाचेल.'

'तेच तर मलाही माहीत नाही. तू असं गृहीत धरून चाल की, सबंध चित्र तपासायचं आहे. तर किती दिवस लागतील?' जॅकच्या उत्तरावर सर्व अवलंबून होते.

'अगदी रात्रीचा दिवस केला तर एक आठवडा लागेल.' जॅक उत्तरला.

'ठीक आहे, मी तुझ्याकरता झोप न येण्याच्या गोळ्या घेऊनच आलो आहे.' बिल हसत उत्तरला.

जॅकची पद्धतशीर काम करणारा म्हणून ख्याती होती. त्याने त्या फोटो वेगवेगळे भाग स्पष्ट दिसावेत म्हणून काल्पनिक आडव्या-उभ्या रेषांनी त्याचे छोटे मोठे विभाग केले. बिलने आणि त्याने प्रथम हिरव्या माणसावर आणि मग स्पेसशिपवर लक्ष केंद्रित करायचे ठरवले. जॅकची आणि त्याच्या उपकरणांची क्षमता पाहून बिल तर चकित होऊन गेला. प्रत्येक हिरव्या माणसाच्या हाताची बोटे दिसतील इतक्या स्पष्टपणे जॅकची उपकरणे त्या फोटोतली माहिती गोळा करू शकत होती.

'अशी उपकरणे फार नसतील नाही?' बिलने कौतुकाने विचारले.

'माझ्या माहितीप्रमाणे इतकं कार्यक्षम असणारं जगातलं हे एकमेव उपकरण आहे. ते मीच तयार केलं आहे.' कृत्रिम विनयाने जॅक उत्तरला.

पण जॅक किती जरी कार्यक्षम असला तरी काळाची गति थांबवू शकत नव्हता. तासामागून तास जात होते आणि अजून काही सापडत नव्हते. सहावा दिवस उजाडला तोपर्यंत बिलला त्या 'हिरव्या माणसा'कडून काहीही माहिती मिळाली नव्हती. त्या दिवशी स्पेसशिपची पाहणी होणार होती.

सहाव्या दिवशी जॅक एकटा आला नाही. आपल्या दहा वर्षांच्या मुलाला, जॅक ज्यूनियरला, घेऊन आला होता. हा मुलगा भलता चौकस होता. पण हुशारही होता. त्याच्या प्रश्नांची बोलिंग परतवता जॅकच्या आणि बिलच्या नाकी नऊ आले.

'मी तुला एक प्रश्न विचारू?' अखेर बिलने प्रश्न केला. जॅक ज्युनियरने मान हलवताच बिलने विचारले, 'तू आज इकडे का आलास आणि किती वेळ थांबणार आहेस?'

'बिल काका ! मी बाबांना मदत करायला आलो आणि त्यांचं काम पुरं झालं की त्यांना हायकिंगला घेऊन जाणार. खरं म्हणजे आम्ही सहा दिवसांपूर्वीच जाणार होतो.' - जॅक ज्युनियरच्या सुरात तक्रारीचा आभास होता.

सहावा दिवस संपत आला आणि जॅकने स्पेसशिपच्या चित्राची छाननी पुरी केली. पण अजून त्यांना काही म्हणण्याजोगे सापडले नाही. बिलाला तरी नक्की कुठं कल्पना होती की, आपण काय शोधतो आहोत? जॅकने एन्लार्ज केलेले सर्व प्रिंटस् त्याच्याजवळ आता होते.

'झालं बुवा माझं काम.' दीर्घ श्वास सोडत जॅक म्हणाला, 'आता तुझं तू पाहून घे. मी जातो आता माझ्या हायकिंगवर. काय ज्यूनियर येणार का? मी जरा बाथरूमकडे जाऊन येतो.'

जॅक बाहेर गेला आणि बिलला एकदम निराशेने घेरले. इतका प्रयत्न करून शेवटी काहीच हाती आले नाही. रॉजर व त्याचे सहकारी त्यांच्या अंतराळयात्रेवर जाऊ नयेत यासाठी केलेले प्रयत्न फुकटच गेले. बिलला सारखे वाटत होते की, हे लोक एकदा ह्या यात्रेवर गेले तर परतच येणार नाहीत, का? - ते त्याला सांगता आले नसते - मात्र फ्रॉस्टचे झाले तेच ह्यांचे पण होणार असे त्याला वाटत होते.

'हे पाहा हा माणूस हॅम्बर्गर खातोय.' जॅक ज्यूनियरच्या आवाजाने तो एकदम भानावर आला. अशा प्रसंगीसुद्धा ह्या पोराला हॅम्बर्गरच दिसतो. आहे खरा 'टिपिकल अमेरिकन किड !' पण मग त्याचे लक्ष गेले - तो पोरगा एक प्रिंट पाहात होता.

तो एकदम उठून तिकडे गेला आणि त्याने जॅक ज्यूनियरच्या हातून ते प्रिंट हिसकावूनच घेतले.

'बिग मॅक आहे तो.' हॅम्बर्गरचा एक्सपर्ट उद्गारला !

बिलने लक्ष देऊन पाहिले. खरोखरच पायलटच्या जागी बसलेला हिरवा माणूस दोन हातात सँडविचसारखे धरून खात होता. त्याच्या चेहऱ्यावरचा भाव पाहून जॅक ज्यूनियर ठासून म्हणाला, 'तो बिग मॅकच आहे.'

'तसं असलं तर तू मोठाच प्रश्न सोडवलास' बिल उद्गारला.

त्या रात्री लॉस एंजिलिस ते वॉशिंग्टन शेवटच्या फ्लाईटवर प्रवास करताना बिल गेल्या दोन तासांतल्या घडामोडींचा विचार करत होता. बाथरूममधून परत आल्यावर आपण कसे जॅकला परत कामावर जुंपले, त्याने कशी आपल्या कौशल्याची शर्थ करून त्या अंतराळ यानाच्या चालकाच्या हातात दिसणारे सँडविचचे चित्र शक्य तितके मोठे केले आणि शेवटी आपण दोघांनी कसे जॅक ज्यूनियरला खांद्यावर उचलून धरले.

आणि त्यानंतर दोन्ही जॅकना निरोप दिल्यावर आपण मिस्टर बींना फोन लावला. त्यांनी ताबडतोब वॉशिंग्टनला बोलावले. ह्या शेवटच्या फ्लाईटवर आपल्यासाठी जागा बुक केली.

पण अजून ह्या सर्व प्रकाराचा अर्थ लागत नाही. ते यान आणि त्यावरचे लोक पृथ्वीवरचेच आहेत- अमेरिकन असावेत. मग हा काय हायजॅकिंगचा प्रकार आहे? 'स्पेसजॅकिंग' करणारी आणि सरकारकडून प्रचंड पैसा उकळणारी ही कोणा तंत्रज्ञांची टोळी तर नसेल? पण मग ही जगात इतर अनेक ठिकाणी लोकांना दिसली त्याचे कारण काय असेल?

कदाचित मिस्टर बी ह्या प्रश्नांचा उलगडा करतील. त्यांनी फोनवर सांगितल्याप्रमाणे वॉशिंग्टनच्या डलेस एअरपोर्टवर एन्क्वायरी ऑफिसजवळ एक फुला-फुलांचा पिवळा टाय घातलेला

लांब केसांचा तरुण त्याची वाट पाहात होता. मिस्टर बींनी सांगितल्याप्रमाणे तो शेकहँडसाठी हात पुढे करून म्हणाला, 'मी जोनाथन.'

'मी बिल.' बिलने हस्तांदोलन केले व सामान घेऊन त्याच्याबरोबर निघाला.

जोनाथनची मोठी कार बाहेरून साधी असली तरी आत शिरल्यावर वेगळी आहे हे बिलला दिसले. आतून बाहेरचे काही दिसत नव्हते.

'मिस्टर 'बी' ना आपण कुठं काम करतो हे गुप्त ठेवावंसं वाटतं. ते फार लाजाळू आहेत.' जोनाथनने खुलासा केला. एक शोफर कार चालवत होता.

बिलला वॉशिंग्टनची उत्तम माहिती होती म्हणून बाहेरचे दिसत नसूनही त्याला आपण कुठे जात आहोत याची कल्पना आली. एअरपोर्टपासून शहराकडे जाणारा मोठा रस्ता संपून 'बेल्ट वे' हा वॉशिंग्टनभोवती जाणारा महामार्ग आल्यावर कार व्हर्जिनियाकडे वळली. त्या मार्गाने जाऊन काही मैलांनंतर एका छोट्या रस्त्यावर उत्तरेकडे जाऊ लागली. पण इथून पुढे बिलला घोटाळ्यात पाडण्यासाठी शोफरने आडव्या तिडव्या चकरा मारून शेवटी एका मोठ्या इमारतीच्या तळघरातल्या कारपार्कमध्ये कार उभी केली. बिलला आसपासचा भाग पाहायचा मोका न देताच जोनाथनने त्याला जवळच्या लिफ्टमध्ये कोंबले आणि सर्वात उंच मजल्याचे, १२ नंबरचे बटन दाबले. एक-दोन दालने ओलांडून त्याने एका बंद दारावर टकटक केले. दारावर 'मि. बी.' असे लिहिले होते. हा कसा दिसतो ह्याबद्दल बिलला फार उत्कंठा होती. पण त्याची निराशा झाली. आत कोणी नव्हते.


टेबलासमोर एकच खुर्ची होती. त्यावर बसावे की नाही याचा तो विचार करत असताना कुठूनतरी आवाज आला.

'बिल, त्या खुर्चीवर बैस.'

तो कुठून आवाज आला हे पाहू लागला. जोनाथन तर केव्हाच दार बंद करून गेला होता. इतक्यात परत आवाज आला, 'माफ कर ! मी फार लाजाळू असल्याने तुझ्यासमोर येऊ शकत नाही. पण मी पुढे बसलोय असे समजूनच बोल आणि तुला काही दाखवायचे असले तर ते टेबलावर ठेव. मला ते दिसेल.'

'मला रॉजर बकलंडच्या स्पेसमिशन-संबंधी सांगायचंय. त्यांची- म्हणजे त्या सर्व लोकांची ट्रिप फुकट जाऊ नये-तिला धोका पोचू नये म्हणून मी आलो. माझ्याकडे महत्त्वाचा पुरावा आला आहे. म्हणून मी तुम्हाला फोन केला. तुम्ही हे मिशन थांबवा - त्याची गरज नाही.'

'ते मला आता जमेल असं वाटत नाही. अवघे सात तासच उरले आहेत. पण माझा नंबर तुला कसा मिळाला? आणि असा कुठला पुरावा तुझ्याकडे आला आहे? जर तू मला पटवू शकलास तर रॉजर व त्याच्या मित्राच्या हिताच्या दृष्टीने योग्य वाटल्यास मी त्यांची ट्रिप

विजयश्री शिक्षण संस्था मर्यादित, सांगली.

१०३०, जयभवानी चौक, खणभाग, सांगली.

संस्थापक अध्यक्ष

▲ श्री. गोपाळ जोशी ▲

उपाध्यक्ष

▲ श्री. रघुनाथराव जाधव ▲

सर्व सदस्य, सभासद व आश्रयदाते.

दीपावलीनिमित्त हार्दिक शुभेच्छा!

थांबवण्याचा शक्यतो प्रयत्न करीन.'

'मला रॉजर बकलंडनेच तुमचा नंबर दिला. पृथ्वीच्या आसपास उडत्या तबकड्या दिसतात, त्यातील हिरव्या लोकांनी आपली अंतराळ याने धोक्यात आणली, ते लोक पृथ्वीवर इतरत्र पण दिसले.'

'हे सर्व तुला रॉजरने सांगायला नको होते. ही 'ब्रीच ऑफ सेक्युरिटी' होते.' बी एकदम म्हणाले.

'कबूल. पण खुद्द रॉजरला आपण ह्या मिशनवरून जिवंत परत येणार नाही, असं वाटत होतं. त्याने फ्रॉस्टचा अनुभव मला सांगितला. रॉजरची अशी ठाम समजूत आहे की, एखाद्या परकीय पृथ्वीबाहेरच्या संस्कृतीतून हे लोक आले नसावेत. त्याने पूर्वीची पुष्कळ उदाहरणं दिली. जिथं लोकांनी उडत्या तबकड्या पाहिल्याची विधानं खोटली ठरली आहेत.' - बिल.

'मग काय हे सर्व मायाजाल आहे? जर रॉजरने तुला इतक्या विश्वसात घेतलं तर आमच्या इलेक्ट्रॉनिक्स चित्रीकरणाची पण माहिती दिली असेल!'

मिस्टर 'बी'च्या औपरोधिक स्वराकडे जाणूनबुजून दुर्लक्ष करून बिलने काही फोटो टेबलावर रचले आणि म्हणाला, 'होय, हा पाहा तयाने मला दिलेला फोटो. हा खरा आहे याची आधी खात्री करा.' काही क्षण गेल्यावर मिस्टर बींचा आवाज आला, 'हो तो खरा आहे.'

'मग ही पाहा त्यातून मी विश्लेषण करून मिळवलेली माहिती.' असे म्हणून बिलने जॅकबरोबर केलेल्या उपक्रमाची माहिती दिली आणि इतर फोटोंकडे बींचे लक्ष वेधले. शेवटी तो म्हणाला,

'हा अगदी अमेरिकन हॅम्बर्गर खाणारा चालक ज्या यानात आहे ते पृथ्वीबाहेरून आलं असेल असं मानायला मी तयार नाही. हे सर्व लोक व त्यांचे यान आपल्याच पृथ्वीवरून आलेले आहे आणि आपले शास्त्रज्ञ-तंत्रज्ञ पळवण्याचा त्यांचा डाव दिसतो. पूर्वी बेपत्ता झालेली याने आणि त्यातले लोक यांनीच पकडले असणार. हे आता आपले सर्वोत्कृष्ट दर्जाचे शास्त्रज्ञ आणि तंत्रज्ञ पळवणार म्हणून हे मिशन थांबवा. माझी उल्ट अशी सूचना आहे की, यांच्या संभाव्य हल्ल्याला तोंड देणारी एक लढाऊ टीम पाठवा.'

'बी' बराचवेळ शांतपणे त्याचे बोलणे ऐकून विचार करत असावे. ते काय निर्णय देतील?

'बिल, तुझे अभिनंदन ! तू एक मोठं काम केलंस- जे आम्हाला शक्य झालं नाही ते. मी आधी म्हटलं त्याप्रमाणे वेळ कमी आहे पण मिशन थांबवणं अशक्य नाही. मी तुलाच याचं श्रेय देतो. मी सांगतो त्याप्रमाणे तू आत्ताच फ्लॉरिडाला जायला नीघ. मी सर्व व्यवस्था करतो.'

बिलने सुटकेचा श्वास सोडला.

बिलला मार्गी लावल्यावर मिस्टर बींनी आपल्या टेबलाकडे पाहिले. त्यावर तीन फोन होते. एक काळा, एक हिरवा, एक लाल. काळ्या फोनवर त्यांनी आपल्या हस्तकांना सूचना दिल्या होत्या. आता त्यांनी हिरवा फोन उचलला.

'मिस्टर ए?' त्यांनी विचारले.

'बोलतोय ! काय 'बी' सर्व तयारी झाली?'

'होय ! पण एक वांधा आलाय. आत्ताच माझ्याकडे एक एफ. बी. आय. एजंट बिल बोन्स येऊन गेला. त्याने असा पत्ता लावलाय की, ती हिरवी माणसे पृथ्वीवरची आहेत.'

'ए'च्या तोंडून एक शिवी बाहेर पडली. पण स्वतःला आवरून त्यांनी खुलासा मागितला. 'बी'ने सर्व हकिकत सांगितली. ती ऐकून 'ए' म्हणाले :

'जॉर्ज किती तरी निष्णात यानचालक असला तरी त्याच्यात एक दोष आहे. तो भलता खादाड आहे. मी परवा एका पार्टीला गेलो तिथे तो एकानंतर एक हॅम्बर्गर चापत होता आणि म्हणत होता, 'हे किती खाल्ले तरी थोडेच.' आता त्याचा खादाडपणा आपल्याला भोवला. किती काळजीपूर्वक आपण हा प्लॅन आखला होता. रॉजर व त्याचे साथीदार पळवल्यावर जगात घबराट निर्माण झाली असती. तो सिनेटर ब्लॅकमन आणखी भाषणे देत बसला होता. सामान्य लोकांना वाटले असते खरोखर बाहेरून ही याने येतात. ते घाबरले असते. त्याउलट आपले शास्त्रज्ञ तितक्याच जोरात म्हणाले असते की, उडत्या तबकड्या वगैरे सगळे झूट आहे, मायाजाल आहे आणि ही वादावादी चालू असताना आपल्याला मात्र ह्या शास्त्रज्ञांचा आणि यानांचा सर्रास वापर हेरगिरीकरिता करता आला असता. खुद्द आपल्या प्रेसिडेंटची त्याला संमती होती व हा सर्व प्लॅन ढासळून पडला जॉर्जच्या खादाडपणामुळे.'

'अजून वेळ गेलेली नाही.' 'ए' ला थांबवत 'बी' म्हणाला, 'मी त्या बिलला फ्लॉरिडाला पाठवलंय. तुझी परवानगी असली तर आपण त्याला पण त्या मिशनवर पाठवू. माझ्या माहितीप्रमाणे अजून इतर कोणाला त्याने स्वतःला कळलेल्या गोष्टी सांगितलेल्या नाहीत. आपला एवढा महत्त्वाचा प्रॉजेक्ट एका माणसाच्या हुशारीपुढे कोलमडता कामा नये.' बीच्या सुरात दिलगिरी होती. बिलच्या तडफदारीबद्दल त्याला आदर वाटत होता. पण त्याचा नाइलाज होता. व्यक्तीपुढे राष्ट्राला महत्त्व देणे आवश्यक होते.

'शाब्बास ! उत्तम तोडगा काढलास तू बी !' 'ए' उत्साहाने म्हणाला. 'त्या इतर शास्त्रज्ञांबरोबर आपण त्याची पण रवानगी करू त्या आफ्रिकेतल्या जंगलातल्या भूमिगत वसाहतीत.'

'पण मला ह्या सर्व प्रकाराबद्दल पुनर्विचार करावासा वाटतो. आपल्यासारख्या व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार करणाऱ्या राष्टणाने स्वतःचेच नागरिक असे पळवून एके ठिकाणी डांबून ठेवणं बरं दिसतं का?' 'बी'ने एक शंका मांडली.

'पण हे नागरिक आपल्याच राष्ट्राने पळवले हे कोणाला कळणार? ज्यांचा विश्वास उडत्या तबकड्यांवर आहे ते लोक ह्या अपहरणाची जबाबदारी त्या परकीय हिरव्या लोकांवर टाकणार.

बर्म्युडा त्रिकोणावर विश्वास ठेवणारे किती लोक आहेत, तसेच ! त्याउलट ज्यांचा ह्यावर विश्वास नाही असे लोक हा अंतराळातला अपघात म्हणून गप्प बसतील - फार तर काही काळ अंतराळ यात्रा बंद करा असे म्हणतील. अथवा आणखी मोठी एन्क्वायरी करा म्हणाले तर करू ! परंतु आपल्या राष्ट्रावर ठपका कसा येईल?... व शिवाय राजकारणात नीतिमत्ता जरा डळमळीतच असते ! स्वतः अणुशक्तीचा संहारक अस्त्रांसाठी सर्रास वापर करून इतरांना करू नका म्हणणारे आपणच नाही का?.... आणि आपण काही जन्मभर ह्या अपहरांना डांबून ठेवणार नाही. दहा वर्षांचा आपला प्रॉजेक्ट संपला की ते हळूहळू परत येतील. त्यावेळी पण अशी क्लुप्ती वापरायची आहे, नाही का?'

'बरं माझी दुसरी शंका. हे रॉजर-सारखे जबाबदार शास्त्रज्ञ आणि तंत्रज्ञ अंतराळातून टेहळणी, हेरगिरी अशासाठी आपल्या ज्ञानाचा फायदा होऊ देतील का? आणि तोदेखील त्यांना असे मनाविरुद्ध डांबून?'

'ती काळजी तू करू नको. एकतर ह्या सर्वांना आपल्या वसाहतीत नेल्यावर त्यांना जे काही सांगण्यात येईल, त्यावरून आपण एका राष्ट्रीय सुरक्षेच्या मोठ्या योजनेत सहभागी होणार आहोत असं त्यांना वाटेल. आणि दुसरी गोष्ट म्हणजे योग्य तऱ्हेने एखादा मुद्दा मांडला तर शास्त्रज्ञसुद्धा मदत करतात. दुसऱ्या महायुद्धाची गोष्ट वेगळी पण त्यानंतरच्या शांततेच्या काळातसुद्धा महासंहारक अस्त्रे, ती योग्य ठिकाणी टाकण्याची सिस्टिम वगैरे काय राजकारणी लोकांनी बनवली? ती बनवली शास्त्रज्ञांनीच. फक्त आपण करतो ते राष्ट्रहिताच्या दृष्टीने करतो असे त्यांच्यावर मनावर बिंबवण्यात आलं. ह्या वेळी पण तसेच सांगण्यात येत आहे. तो फ्रॉस्ट तर आता मोठ्या उत्साहाने आम्हाला मदत करतोय.'

'मी स्वतः एकेकाळी शास्त्रज्ञ होतो. म्हणून मला आपल्या प्रॉजेक्टबद्दल अशा शंका अधूनमधून येतात. पण ह्या वेळी तू त्याचे निरसन केलंस !' 'बी' म्हणाला. 'फक्त एकच मुद्दा राहिला.'

'तो कुठला?'

'हा बिल माझ्या यंत्रणेत काम करत नाही. त्यामुळे त्याला पळवण्याची परवानगी मला देता येत नाही. ती अगदी वरच्या पातळीवरून मिळाली पाहिजे.' 'बी'ची नजर पांढऱ्या टेलिफोनकडे गेली.

'ती व्यवस्था मी करतो.'

१६०० पेन्सिल्व्हानिया ॲव्हेन्यू ह्या वॉशिंग्टनमधल्या शुभ्र प्रासादात ओव्हल ऑफिस म्हणून ओळखल्या जाणाऱ्या खोलीत एका व्यक्तीने आपल्या टेबला-वरच्या अनेक फोनपैकी एकाचा रिसीव्हर उचलला.

'बी'च्या पांढऱ्या फोनमधून घंटा वाजायला लागली.

✪✪✪